# पोलीस आयुक्तालय, अमरावती

## ई - पोलीस पत्रिका

*दि. ०३/११/२०१८* *अनु.क्र.२२५/१८*

## *(अमरावती शहर पोलीसांची २०१८ ची उद्दिष्टे)*

- *जागरूक व तत्पर पोलीस.*
- *नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.*
- *उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.*
- *महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.*
- *जातीय सलोखा वाढविणे.*
- *संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.*
- *रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण*
- *सुरक्षा.*
- *पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.*
- *आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.*
- *"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू*

## <u>भाग - १</u>

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

### नेमणुक

**१.क्र.पोआअश/पशा/प्रलि/विधी अधिकारी/नियुक्ती/१११३७/२०१८ अमरावती दि. ०२.११.२०१८**

**आदेश**

श्री. विश्वास शरदचंद्र वैदय, रा. शांकातुल सोसायटी, व्हि.एम.व्ही. जवळ, अमरावती यांना दि. ०३.११.२०१८ ते दि. १३.१०.२०१९ पर्यंत हजर झाल्याचा दिनांकापासुन एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने निव्वळ ११ महीन्यासाठी कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात विधी अधिकारी गट-ब पदासाठी नेमणुक करण्यांत येत आहे.

### बदली

**१.क्र.पोआअ/आस्था-१/पोना-१०४८-देशमुख/घटक बदली/१११३५/२०१८ अमरावती दि. ०१.११.२०१८**

विषय :- पोलीस नाईक/१०४८, ओमप्रकाश निळकंठराव देशमुख यांची रत्नागिरी जिल्हा पोलीस घटकात बदली झाल्याने त्यांना कार्यमुक्त करण्यांबाबत.

**आदेश**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवरी **पोलीस नाईक/१०४८ ओमप्रकाश निळकंठराव देशमुख, नेमणुक विशेष शाखा (दहशतवाद विरोधी केंद्र), अमरावती शहर** यांची दि. २९.१०.२०१८ अन्वये अमरावती शहर ते रत्नागिरी जिल्हा अशी त्वरीत प्रभावाने प्रशाकीय कारणास्तव बदली करण्यांत आल्याने त्यांना **रत्नागिरी जिल्हयात बदलीच्या** ठिकाणी हजर होण्यासाठी **अमरावती शहर घटकामधुन दि. ०१.११.२०१८ चे माध्यान्होत्तर पासुन कार्यमुक्त करण्यांत येत आहे.**

## वेतन/ वेतनवाढ/वेतन निश्चिती/सुधारीत वेतन निश्चिती

### सुधारीत वेतन निश्चिती

**१.जा.क्र. पोआअ/आस्था-३/सु.वे.नि./१५९३/कांबळे/११०८४/२०१८ अमरावती दि. ३१.१०.२०१८**

**आदेश**

महीला पोलीस शिपाई/१५९३, ज्योती खुशालराव कांबळे, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर या दि. १०.०४.२००८ ते दि. २२.०९.२०१० या कालावधीत निलंबित होते. दि. २०.०८.२०१८ अन्वये त्यांचा दि. १०.०४.२००८ ते दि. २२.०९.२०१० पावेतोचा निलंबन कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ म्हणुन गणण्यांत

आल्याने तसेच दि. ०४.०७.२०१८ अन्वये दि. २३.०९.२०१० ते दि. १४.०६.२०११ पावेतोचा सेवाबाहय कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ झाल्याने त्यांची दि. ०१.०१.२००६ पासुन पोलीस शिपाई पदाच्या सुधारीत वेतन बँड रु. ५२००-२०,२००/- ग्रेड वेतन रु. २०००/- मध्ये सुधारीत वेतन निश्चती करुन आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

**२.जा.क्र.पोआअ/पशा-१/पोनि. मेश्राम/सुधारीत वे.वा./१११२४/२०१८ अमरावती दि. ०१.११.२०१८**

**आदेश**

श्री. पुंडलिक मेश्राम, पोलीस निरीक्षक, नेमणुक नियंत्रण कक्ष यांना दि. ३०.०६.२०१८ अन्वये त्यांना दि. ०१.०७.२०१८ रोजी मंजुर करण्यांत आलेल्या वार्षिक क्रमप्राप्त वेतनवाढीमध्ये तफावत असल्याने दि. ०१.०७.२०१८ च्या वेतनवाढीमध्ये खालील नमुद प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

| **विदयमान वेतन व दिनांक स्तंभ अ** | | | **सुधारीत वेतन व दिनांक स्तंभ ब** | | |
|---|---|---|---|---|---|
| **वेतनवाढीचा दिनांक** | **विदयमान वेतन बँड / वेतन श्रेणी मधील वेतन** | | **वेतनवाढीचा दिनांक** | **विदयमान वेतन बँड / वेतन श्रेणी मधील वेतन** | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१.०७.२०१७ | २०३४०/- | ५०००/- | ०१.०७.२०१७ | २०३४०/- | ५०००/- |
| ०१.०७.२०१८ | २५३४०+९१०-२६२५०/- | ५०००/- | ०१.०७.२०१८ | २०३४०+७६०-२११००/- | ५०००/- |

श्री. पुंडलिक मेश्राम, पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष यांना दि. ०१.०७.२०१८ पासुन स्तंभ अ प्रमाणे अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करण्यांत यावी.

**३.क्र. पोआअ/आस्था/वा.वे.वाढ/श्री.४७९ सामुद्रे/११०८५/२०१८ अमरावती दि. ३१.१०.२०१८**

**आदेश**

पोलीस शिपाई/४७९ उज्वल वसंतराव सामुद्रे, नेमणुक पोलीस मुख्यालय अमरावती शहर हे यांच्या विनंतीवरुन पोलीस अधिक्षक, अकोला यांचे आस्थापनेवरुन पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर आंतरजिल्हा बदलीवर झाल्याने त्यांना दि. ०८.०२.२०१८ अन्वये पोलीस शिपाई या पदावर हजर करुन घेण्यांत आलेले आहे.

त्यांना दि. ०१ जुलै २०१८ ची वेतनवाढ मंजुर करतांना त्यांचे सेवापट प्राप्त न झाल्यामुळे त्यांना दि. ०१.०७.२०१८ ची वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यांत आली नव्हती. परंतु त्यांचे सेवापट दि. १५.१०.२०१८ रोजी प्राप्त झाल्यामुळे त्यांना दि. ०१.०७.२०१८ ची वार्षिक वेतनवाढ खालील प्रमाणे मंजुर करण्यांत येत आहे.

| **दि. ०१.०७.२०१८ ची वार्षीक वेतनवाढ** | | |
|---|---|---|
| **वेतनवाढीचा दिनांक** | **वेतन बँड/वेतनवाढ** | **ग्रेड वेतन** |
| ०१.०७.२०१७ | रु. १०५१०/- | रु. २४००/- |

| | | |
|---|---|---|
| ०१.०७.२०१८ | रु. १०५१०+३९०=१०९०० | रु. २४००/- |

## शिक्षा/निलंबन/पुन:स्थापीत/बक्षिस

## शिक्षा

**१.क्र.पोआअ/विचौ-१/कसुरी/गैरवर्तन/अंतिम आदेश/पोना-१०४८ देशमुख/१११३४/१८ दि. ०१.११.१८**

**कसुरदाराचे नावं :-** पोना. ओमप्रकाश निळकंठराव देशमुख, ऐ.टी.सी. अमरावती शहर

**थोडक्यांत कसुरी :-**

पोना. १०४८, ओमप्रकाश निळकंठराव देशमुख, नेमणुक गुन्हे शाखेत असतांना तुम्ही दि. ११.०४.२०१८ रोजी गोपनिय माहीतीनुसार कॉलनी येथे त्रिरत्न वेल्फेअर सोसायटी या नावाखाली एका राहत्या घरात सुरु असलेल्या पत्याच्या जुगार क्लबवर धाड टाकण्यांत आली. सदर घटनास्थळावर २६ आरोपी जुगार खेळतांना सापडले असुन त्यांचेकडुन जुगाराची रक्कम एकुण रुपये ३,३४,२०७/- रोख स्वरुपात व ईतर जुगाराचे साहीत्य जप्त करुन अप क्र. ३८९/२०१८ कलम ४,५ म.जु.का., ६५ (अ) म.दा.का. अन्वये पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे आरोपीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यांत आला आहे.

सदर घटनास्थळी टि.व्ही.वर आय.पी.एल.क्रिकेट मॅच चालु होतु. त्यातील काही आरोपी हे आपल्या मोबाईल मधील ॲपव्दारे क्रिकेट सटटा खेळत असल्याचे पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यांना दिसुन आले. सदर जुगार क्लब चालु देणेबाबत व हप्त्यापोटी पैसे मागतांनाचे रेकॉर्डींग सुध्दा मिळुन आले.

सदर अश्या कसुर प्रकरणी तुमचे विरुध्द प्राथमीक चौकशी आदेशित करुण्यांत येवून ती पोनि. पो.स्टे. नांदगाव पेठ यांना चालविण्यांस देण्यांत आली होती. त्यानुसार सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन सदरचा प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला असता असता त्यामध्ये तुमचे विरुध्द काही बाबी निष्पन्न झाल्या आहेत.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुर प्रकरणी **पोना.१०४८, ओमप्रकाश निळकंठ देशमुख यांना देय वार्षिक वेतनवाढ तिन वर्षाकरीता स्थगित करण्याची शिक्षा तसेच तुमचा निलंबन कालावधी दि. २६.०४.२०१८ ते दि. ३०.०६.२०१८ पावेतोचा हा जसाचे तसा गणण्यांत येत आहे.**

## निवासस्थान/इमारत संबधी/संकीर्ण

## निरंक

# वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

खालील नमुद पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचा कार्यालयीन अभिलेखानुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेस वाढदिवस असल्याने त्यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर तसेच पोलीस आयुक्तलयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे तर्फ वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा देण्यात येत आहे. तसेच वाढदिवस असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.

| अ.क्र. | पदनांम | ब.नं. | पोलीस अधिकारी कर्मचारी यांचे नाव | नेम णुक | वाढदिवस दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोउपनि. | --- | श्री. कपिल मिश्रा | सीएमसी | ०३.११.२०१८ |
| ०२ | पोहवा. | ११२ | श्री. राजु देशमुख | मोपवि | ०३.११.२०१८ |
| ०३ | पोना. | १०२५ | श्री. महेंद्र गावंडे | गुन्हे शाखा | ०३.११.२०१८ |
| ०४ | पोना. | १०४५ | श्री. सुनिल साखरकर | पोमुख्या | ०३.११.२०१८ |
| ०५ | पोना. | १२२५ | श्री. दिपक रायबोले | कोतवाली | ०३.११.२०१८ |
| ०६ | पोशि. | ५४ | श्री. निलेश वरघट | शवाशा प. | ०३.११.२०१८ |
| ०७ | पोशि. | ३९८ | श्री. रविंद्र सावळे | पोमुख्या | ०३.११.२०१८ |
| ०८ | पोशि. | १३६२ | श्री. दिनेश बैस | राजापेठ | ०३.११.२०१८ |
| ०९ | पोशि. | १३६४ | श्री. अमोल नेवारे | | ०३.११.२०१८ |

**( दे. बा. राठोड )**
**प्रशासक ीय अधिकारी**
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

प्रत, पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक , आस्थापना शाखा यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता